ePaper
वर्ष - 7 ।अंक -21 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । बुधवार, दि. 17 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# गौतमी पाटीलला जिल्हा बंदी करा, तिच्यावर गुन्हा दाखल करा: अंबादास खैरे



**आतील पानांत**

- पिंपरी-चिंचवडच्या पाण्यावर फडणवीसांनी काढला तोडगा!
- खासदार कोल्हेंना धमकी देणाऱ्या पोलिसाला आयुक्तांनी पाठवले घरी

## प्रस्तावित 'शिवनेरी' जिल्ह्याच्या मागणीवरून

# खासदार कोल्हे–आमदार लांडगे 'आमनेसामने'!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी पुणे जिल्ह्याचे विभाजन करून पिंपरी- चिंचवडलगतच्या परिसराला 'शिवनेरी' जिल्हा असे नाव द्यावे, अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर केल्यानंतर राजकारण तापण्यास सुरुवात झाली आहे.**





नवीन जिल्ह्यावरून आता शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांनी नवीन जिल्हा करण्यापेक्षा पायाभूत सुविधांवर लक्ष द्यावे. शिवनेरी या नावाला माझा विरोध नाही. पण ही मागणी का केली जातेय? असा प्रश्न कोल्हे यांनी उपस्थित केला आहे. त्यापेक्षा पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेला गती द्या अशी मागणी त्यांनी केली आहे. खासदार कोल्हे पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

अमोल कोल्हे म्हणाले, "शिवनेरी या नावाला माझा विरोध नाही. पण, या मागणीचा सर्वांगीण विचार होणे गरजेचे आहे. मागणी का केली जात आहे?, नेमके पर्याय काय आहेत. याचा विचार व्हायला हवा." पुढे ते म्हणाले, "प्रशासकीय सोयीसाठी करणार असाल तर त्यापेक्षा पुणे- नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेला गती द्यावी. यामुळे जुन्नर ते पुणे अंतर कमी होऊन या टोकापासून त्या टोकापर्यंत अर्धा तासात जाऊ शकू. पुणे, पिंपरी- चिंचवडमध्ये लोकसंख्या प्रचंड वाढत असल्याने पायाभूत सुविधांवर ताण वाढतो आहे. पुढील २५ ते ३० वर्षांचा विचार करून एक सुनियोजित शहर वसवले तर त्याचा आपल्याला जास्त फायदा होईल. यामुळे नागरिकांचे राहणीमान उंचावेल."

तसेच, "जिल्ह्याचे विभाजन करून प्रशासकीय सोयीसाठी मुख्यालय कुठे असणार? जागा कुठे आरक्षित होणार?, सरकारी तिजोरीवर ताण किती वाढणार? तीच ताकद पायाभूत सुविधांवर लावली तर लोकांना फायदा होईल. पुणे जिल्हा विभाजनामागे राजकीय रंग असू शकतो. प्रत्येक पक्षाची शिरूर लोकसभा मतदारसंघावर महत्वकांक्षा असणार आहे. जास्तीत जास्त जागा मिळवण्याचा प्रयत्न भाजपाचा असणार आहे यात काहीच गैर नाही" असेही अमोल कोल्हे म्हणाले आहेत. नवीन शिवनेरी जिल्ह्याच्या मागणीमुळे शिरूर लोकसभा मतदार संघासह, पुणे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे वर्चस्व असलेल्या या जिल्ह्यात भाजपाने नवा राजकीय 'सुतळी बॉम्ब' फोडल्याचे बोलले जात आहे.

## » पुणे जिल्हा विभाजनाच्या मागणीला राजकीय 'रंग' : जिल्हा विभाजनापेक्षा पायाभूत सुविधा देण्याचा सल्ला

### आमदार लांडगे लोकसभेचे दावेदार?

» पुणे जिल्ह्याचे विभाजन करावे आणि नवीन जिल्ह्याला 'शिवनेरी' हे नाव द्यावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही मागणी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. शिरुर लोकसभा मतदार संघात शिवनेरी किल्ला आहे. त्यामुळे शिव-शंभू प्रेमींच्या जिव्हाळ्याचा व अस्मितेचा विषय असलेल्या या किल्ल्याचे नाव नवीन जिल्ह्याला द्यावे अशी मागणी करीत आमदार लांडगे यांनी शिरुर लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजवला आहे. भारतीय जनता पार्टीकडून आमदार लांडगे शिरुरचे उमेदवार म्हणून मैदानात उतरवण्यात येईल. त्यासाठी भाजपा आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याकडून ताकद दिली जाईल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेची १२० वाहने भंगारात; स्थायी समितीत मंजुरी!

## » प्रशासकीय राजवटीमध्ये वाहतूक विभागाचे सक्षमीकरण: प्रशासक शेखर सिंह यांचा निर्णय

। पिंपरी । महाईन्यूज ।

**महापालिकेच्या सेवेत असलेली जुनी निकामी झालेली १२० वाहने विक्री करण्यास व त्यातून येणारी रक्कम महानगरपालिका कोषागारात भरून घेण्यास मान्यता देण्यात आली.**

महापालिका प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या महापालिका स्थायी समिती सभेत विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये संपन्न झालेल्या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

मनपाचे स्थापत्य प्रकल्प विभागाकडील कामाच्या तरतुदीमध्ये वाढ करण्यास मान्यता देणेत आली. मनपाचे ब प्रभागामध्ये क्रीडा विषयक सुविधांची स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देण्यात आली.

इ – प्रभागामध्ये क्रीडा विषयक सुविधांची स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देणेत आली. सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षाकरिता एकत्रित मानधनावर शिक्षक नेमणुकीस मान्यता देणेत आली.



### यांत्रिकी साफसफाईसाठी सल्लागार नियुक्ती...

» पिंपरी चिंचवड शहरातील १८ मी. व त्यावरील रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करणे कामासाठी तांत्रीक सल्लागार समिती गठीत करण्यास मान्यता देणेत आली. पिं.चिं.म.न.पा च्या चिखली येथे नव्याने होणाऱ्या टाऊन हॉलकरीता उच्चदाब वीजपुरवठा घेणेकामी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड यांना अनामत रक्कम, करारनामा व वीजपर्यवेक्षक शुल्क अदा करण्यास मान्यता देण्यात आली.अमोल कोल्हे म्हणाले, "शिवनेरी या नावाला माझा विरोध नाही. पण, या मागणीचा सर्वांगीण विचार होणे गरजेचे आहे. मागणी का केली जात आहे?, नेमके पर्याय काय आहेत. याचा विचार व्हायला हवा." पुढे ते म्हणाले, "प्रशासकीय सोयीसाठी करणार असाल तर त्यापेक्षा पुणे- नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेला गती द्यावी.

# प्रीपेड वीजमीटर वापरणाऱ्या ग्राहकांना महावितरणकडून सवलतीचा 'शॉक'!

## » सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार कात्री

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरासह राज्यभर प्रीपेड वीजमीटर वापरणाऱ्या ग्राहकांना मिळणाऱ्या सवलतीला एप्रिलपासून तीन टक्क्यांची कात्री लागली आहे. याआधी प्रीपेड वीजमीटर असलेल्या ग्राहकांना वीजदरात पाच टक्के सवलत मिळत होती. मात्र, 'महाराष्ट्र वीज नियामक आयोगा'ने नुकतीच 'महावितरण'ला वीजदरवाढीसाठी मंजुरी देताना वीजदरातील सवलत दोन टक्के केली आहे. त्याचा फटका प्रीपेड वीजमीटर वापरणाऱ्या ग्राहकांना बसत आहे.**



### टाउनशिपमध्ये वापर अधिक

वीजग्राहकांना गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी आणि वीजगळती कमी करण्यासाठी 'महावितरण'तर्फे प्रीपेड मीटर योजना राबविण्यात येते. वीस किलोवॉटपेक्षा कमी जोडभार असलेल्या घरगुती आणि व्यापारी ग्राहकांना प्रीपेड मीटरसाठी अर्ज करता येतो. त्यासाठी त्यांना अतिरिक्त सुरक्षा ठेव द्यावी लागत नाही. प्रीपेड मीटर रिचार्ज केल्यानंतर ग्राहकांना वीजपुरवठा होतो. सध्या पुण्यातील 'डीएसके विश्व' आणि 'नांदेड सिटी'सारख्या मोठ्या टाउनशिपमधील रहिवासी प्रीपेड वीजमीटर वापरतात. त्यांना आतापर्यंत वीजदरात पाच टक्के सवलत मिळत होती. मात्र, आता ही सवलत तीन टक्क्यांनी घटली असून, परिणामी प्रीपेड वीजमीटर रिचार्ज करताना या रहिवाशांचा खिसा थोडा अधिक हलका होणार आहे.

### सवलतीचा 'महावितरण'ला तोटा

'वीजग्राहकांना प्रीपेड मीटर वापरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी महावितरणतर्फे वीजदरात सवलत दिली जाते. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने मार्च २०२० मध्ये दिलेल्या वीजदर निश्चिती आदेशात प्रीपेड वीजमीटर वापरणाऱ्या ग्राहकांना वीजदरात पाच टक्के सवलत जाहीर करण्यात आली होती. मात्र, महावितरणने गेल्या तीन वर्षांत राज्यभरात फारसे प्रीपेड मीटर बसविलेच नाहीत. त्यामुळे वीजग्राहकांना सवलतीचा लाभ घेता आला नाही. महावितरणने काही महिन्यांपूर्वी आयोगापुढे वीजदरवाढीसाठी याचिका सादर केली. त्यामध्ये प्रीपेड मीटरच्या ग्राहकांना वीजदरात पाच टक्के सवलत परवडत नसल्याने ती कमी करावी, अशी मागणी केली. ती आयोगाने मान्य केली. त्यामुळे एप्रिलपासून प्रीपेड वीजमीटर वापरणाऱ्या ग्राहकांना वीजदरात पाच टक्क्यांऐवजी दोन टक्के सवलत मिळत आहे,' असे ज्येष्ठ वीजतज्ज्ञ आणि महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी सांगितले.

### वीस टक्के सेवा शुल्क

»राज्यातील वीजवितरण यंत्रणा आधुनिक करण्यासाठी 'महावितरण'तर्फे लवकरच एक कोटी ६६ लाख ग्राहकांना 'स्मार्ट मीटर' उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. केंद्र सरकारच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेच्या पहिल्या टप्प्यात पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि कोकण या चार प्रादेशिक विभागांमध्ये सुमारे १५ हजार कोटी रुपये खर्चून 'स्मार्ट मीटर' बसविण्यात येणार आहेत. त्या अंतर्गत पुणे प्रादेशिक विभागात चार हजार ४१८ कोटी रुपये खर्चून ३७ लाख ६८ हजारांपेक्षा अधिक 'स्मार्ट मीटर' बसविले जाणार आहेत. त्यासाठी 'अॅडव्हान्स्ड मीटरिंग इन्फ्रास्ट्रक्चर' (एएमआय) सेवा पुरवठादार नियुक्तीसाठी 'महावितरण'ने निविदा काढल्या आहेत. हे 'स्मार्ट मीटर' बसविणाऱ्या ग्राहकांना वीजदरातील सवलतीचा लाभ मिळणार आहे.

> “ राज्य वीज नियामक आयोगाने नुकत्याच दिलेल्या आदेशात प्रीपेड वीजमीटर असलेल्या वीजग्राहकांना वीजदरात दोन टक्के सवलत देण्याचा आदेश आहे. पूर्वी दिल्या जाणाऱ्या सवलतीचे आर्थिक गणित तपासून 'महावितरण'ने या संदर्भात आयोगाकडे प्रस्ताव सादर केला होता, तसेच त्यावर नागरिकांच्या हरकती-सूचनाही मागविल्या होत्या.
>
> - राजेंद्र पवार, मुख्य अभियंता, 'महावितरण' पुणे परिमंडळ

---

# माझा मुलगा जनतेची सेवा करायचा, दादा त्याला न्याय द्या!

## »किशोर आवारेंच्या आईचा आक्रोश, पालकमंत्र्यांकडून सांत्वन

। मावळ। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळेगाव दाभाडे येथील सामाजिक कार्यकर्ते आणि जनसेवा समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांची तीन दिवसांपूर्वी निर्घृण हत्या करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी चोवीस तासांच्या आत आरोपींना अटक केली. त्याच पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आवारे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले आणि किशोर आवारे यांना श्रद्धांजली अर्पण केली.**



**दोषींवर कठोर कारवाई केली जाईल**

»चंद्रकांत पाटील यांनी आवारे कुटुंबाला धीर दिला. तसेच दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही देखील आवारे कुटुंबियांना दिली. यावेळी भाजपा पुणे जिल्हा अध्यक्ष गणेश भेगडे, माजी मंत्री बाळाभाऊ भेगडे यांच्या सह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

जनसेवा विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांचा निर्घृण खून करण्यात आला होता. या घटनेत मावळचे आमदार सुनील शेळके आणि त्यांच्या भावाविरोधात आवारे कुटुंबियांनी गुन्हा दाखल केला. मात्र या घटनेतील आरोपी वेगळाच निघाला. त्यामुळे झालेले आरोप पाहता सुनील शेळके यांच्या प्रतिमेला हा निश्चितच धक्का होता. त्यामुळे सुनील शेळके यांना समर्थन देण्यासाठी रविवारी मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरले होते.

या भेटीदरम्यान किशोर आवारे यांच्या आई माजी नगराध्यक्षा सुलोचना आवारे यांनी माझा मुलगा तळेगावकरांची प्राणपणाने सेवा करत होता. तळेगावकरांना न्याय पाहिजे. आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली. तसेच या हत्या प्रकरणाचा तपास विशेष पथकाकडे सोपविण्याची मागणी किशोर आवारे यांच्या पत्नीने पाटील यांच्याकडे केली आहे.

# पुण्यात कोल्हा अन् साप विहिरीत पडले, कट्टर वैरी आमनेसामने

।जुन्नर। महाईन्यूज । प्रतिनिधी।



कोब्रा आणि सोनेरी कोल्हा एका विहिरीत अडकले होते. जवळपास २५ फूट खोल असलेल्या कोरड्याठाक पडलेल्या विहिरीत कोब्रा आणि कोल्हा अडकले होते. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी धाडस दाखवून त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू केले. पुण्यातील जुन्नर तालुक्यात असलेल्या राजुरी गावात ही घटना घडली.

साप आणि कोल्हा विहिरीत अडकल्याचं राजुरीतील ग्रामस्थांच्या लक्षात आलं. गावकऱ्यांनी वन विभागाशी संपर्क साधला. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीनं राजुरी गाव गाठलं. कोल्हा आणि साप यांच्यातला संघर्ष तसा फार जुना आहे. दोन्ही प्राणी एकमेकांचे कट्टर शत्रू मानले जातात. त्यांच्यातलं वैर सर्वश्रुत असल्यानं वन विभागानं तातडीनं हालचाली सुरू केल्या.

वन्य प्राण्यांची सुटका करणाऱ्या पथकानं साप आणि कोल्ह्याच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू केले. परिस्थितीचा नीट अभ्यास केल्यानंतर सर्वप्रथम कोल्ह्याची सुटका करण्याचा निर्णय झाला. त्यासाठी एक जाळं खाली टाकण्यात आलं. त्यानंतर पथकातील एक जण कोरड्या विहिरीत उतरला. त्यानं ५ फूट लांबी असलेल्या कोब्रा सापाला बाहेर काढलं. जवळपास दोन तास सुटकेचा थरार सुरू होता. पथकानं दोघांची सुटका करून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सोडलं.


'साप आणि कोल्ह्याला एकमेकांसोबत कोणताही संघर्ष न करता पाहणं हा दुर्मीळ योगायोग होता, असं पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अखिलेश ढगेंनी सांगितलं. 'आम्ही दोन्ही प्राण्यांच्या आरोग्याची तपासणी केली.

# ‘एक्सप्रेस वे’ सुरक्षेसाठी उपाययोजना!

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश : डिव्हायडर तोडल्यास परवाना रद्द

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे-बेंगलुरू राष्ट्रीय महामार्गावर कात्रज नवीन बोगदा ते नवले पूलदरम्यान अपघातांना आळा घालण्यासाठी रस्ता सुरक्षा समितीच्यावतीने सुचविलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी आज घेतला. दरम्यान रस्त्याच्या बाजूच्या व्यावसायिकांनी सेवारस्ता आणि मुख्य मार्गिका यामधील दुभाजक (डिव्हायडर) तोडल्याचे आढळून आल्यास संबंधिताचा व्यवसाय परवाना रद्द करण्यासह कठोर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.**



### शासकीय कार्यालयांमध्ये हेल्मेटबाबत जनजागृती..

सर्व शासकीय कार्यालयात दुचाकीने येणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी हेल्मेटचा वापर करावा यासाठी परिवहन विभाग तसेच पोलीसांनी संयुक्तपणे जनजागृती करावी. ‘एक दिवस डोक्यासाठी’ अशा स्वरुपाची मोहीम राबवत हेल्मेट न वापरणाऱ्यांचे प्रबोधन तसेच दंडात्मक कारवाई करावी, अशी सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी केली. हेल्मेटचे महत्व पटवून देण्यासाठी मास्टर ट्रेनर्स तयार करावेत, असेही ते म्हणाले. यावेळी अहमदनगर रस्त्यावरील अपघात रोखण्याच्यादृष्टीने उपाययोजनांबाबतही चर्चा करण्यात आली. या रस्त्यावरील अपघाताची ठिकाणे (ब्लॅक स्पॉट) निश्चित करण्यात आली असून उपाययोजनांविषयी कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीस पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (एनएचएआय) प्रकल्प संचालक संजय कदम, प्रादेशिक परिवहन अधिकारी अजित शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाप्पा बहीर आदी अधिकाऱ्यांसह ‘सेव्ह लाईफ फाउंडेशन’ संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

खेड शिवापूर ते नवले पूलदरम्यान दररोज सरासरी ३०० वाहनांवर कारवाई..

यापूर्वी झालेल्या समितीच्या निश्चित करण्यात आल्याप्रमाणे कात्रज नवीन बोगद्याच्या अलिकडे जांभूळवाडीनजीक पोलीस चौकी स्थापन करण्यात आली आहे. या रस्त्यावर २४ तास पोलीस मनुष्यबळ तैनात करण्यात आले असून १० अधिकारी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच पोलीस वाहनांद्वारे गस्त घालण्यात येत असून त्याचा चांगला परिणाम झाला आहे. या टप्प्यात विविध वाहतूक नियमांचे उल्लंघनाबद्दल दररोज सरासरी ३०० वाहनांवर कारवाई करण्यात येत आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त श्री. मगर यांनी दिली. दरम्यान व्यवसायाला लाभ व्हावा यासाठी काही हॉटेलचालक तसेच अन्य व्यावसायिक मुख मार्गिका आणि सेवारस्ता यामधील डिव्हायडर तोडत असल्याचे निदर्शनास आले आहे. सेवारस्त्यावरील वाहन अचानक थेट मुख्य मार्गिकेवर तसेच मार्गिकेवरील वाहन अचानक वळत असल्यामुळे अपघात होऊ शकतात. त्यामुळे या व्यावसायिकांच्या विरोधात कठोर कारवाईची शिफारस करावी. गरज पडल्यास संबंधितांचे व्यवसाय परवानेही रद्द करण्यात येतील, असेही डॉ. देशमुख म्हणाले.

वेगमर्यादा तसेच अन्य वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांना रोखून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी ग्रामीण पोलीस आणि शहर वाहतूक विभागाने जिल्हा नियोजन समितीकडे इंटरसेप्टर वाहनासाठीचा प्रस्ताव तात्काळ द्यावा. या रस्त्यावर प्रत्येक मार्गिकेमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आलेले असून ते पोलीस विभागाच्या सॉफ्टवेअरशी जोडावेत, जेणेकरुन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करता येईल, असेही निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले

जड वाहनांची वेगमर्यादा ४० कि.मी. प्रतितास करणार..

कात्रज बोगदा ते नवले पूलादरम्यान अपघात टाळण्याच्या अनुषंगाने जड वाहनांसाठी वेगमर्यादा ६० कि.मी. वरुन ४० कि.मी. प्रतितास इतकी घटवण्याची अधिसूचना तात्काळ काढण्याचे निश्चित करण्यात आले. खेड शिवापूर पथकर प्लाझा येथे सार्वजनिक उद्घोषणा प्रणालीवरुन वाहतूक नियमांची जनजागृती करण्यासाठी सतत उद्घोषणा करण्यात यावी, अशाही सूचना यावेळी देण्यात आल्या. विविध यंत्रणांनी सुचविलेल्या उपाययोजनांवर यावेळी चर्चा करण्यात आली. या रस्त्यावर ब्रेक निकामी झालेल्या वाहनांना रस्त्यावरुन बाजूला जाण्यासाठी इमर्जन्सी एस्केप प्लॅनअंतर्गत बाहेर पडण्याचे ठिकाण (एक्झिट रॅम्प) तयार करण्याबाबत पाहणी केली असल्याचे एनएचएआयचे ्रकल्प संचालक श्री. कदम यांनी सांगितले. याबाबत आवश्यक तो अभ्यास करुन तात्काळ प्रस्तावाला संबंधित यंत्रणेची मान्यता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी दिले.

---

# अनेक वर्ष पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात साकार!

## माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांची भावना : पिंपरी डेअरी फार्म रेल्वे उड्डाणपुलाचे ई-भूमिपूजन

।पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विकासकामांची उद्घाटने, भुमीपूजने करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री हे सोमवारी (ता.१५) आले होते. यावेळी त्यांना काळे झेंडे दाखविणाऱ्या छावा संघटनेचे पिंपरी-चिंचवड शहर उपाध्यक्ष गणेश भांडवलकर यांना पोलिसांनी पकडले.**





### पिंपरीकरांमध्ये आनंदाचे वातावरण...

कित्येक वर्षे रखडलेल्या या प्रकल्पाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते झाल्याने संपूर्ण पिंपरीकरांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुमारे ५८,५७,३०,५७७/- ( अठ्ठावन्न कोटी, सत्तावन्न लाख, तीस हजार,पाचशे सत्त्याहत्तर) रुपयांची निविदा असलेल्या मिलेट्री डेअरी फार्म उड्डाणपुलाचे काम मार्गी लागल्याने पिंपरीगाव, रहाटणी,पिंपळे सौदागर, काळेवाडी, साई चौक,व परिसराचा वाहतुकीचा मोठा प्रश्न मार्गी लागून नागरिकांना दिलासा मिळणार आहे. या उड्डाण पुलामुळे पिंपरी गावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून अनेक वर्ष पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात साकार झाले असल्याची भावना संदीप वाघेरे यांनी व्यक्त केली आहे.

पिंपरी मिलेट्री डेअरी फार्म परिसरातील रेल्वे उड्डाणपुलाचे ई भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आकुर्डी येथे करण्यात आले. अशी माहिती माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी दिली आहे.याविषयी अधिक माहिती देताना वाघेरे म्हणाले कि, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध विकास कामांचे उद्घाटन व भूमिपूजन समारंभ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस याचे हस्ते तसेच पुणे जिल्ह्याचे पालक मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्याचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानुसार आकुर्डी येथील नव्याने विकसित केलेल्या ग.दि. माडगुळकर नाट्यगृह येथे काल दुपारी विविध विकास कामांच्या उद्घाटन व भूमिपूजन समारंभ संपन्न झाला.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे,आमदार महेश लांडगे,आण्णा बनसोडे,उमाताई खापरे,माजी महापौर माई ढोरे, माजी नगरसेवक संदीप वाघेरे आयुक्त शेखर सिंह तसेच आदी मान्यवर उपस्थित होते.

# घामाच्या धारा अन् विजेचा धक्का!




घामाच्या धारांना विजेचा धक्का!

अघोषित भारनियमनाचे चटकेही घोषित वीजकपातीइतकेच बसतात. त्यावर उपाय वीजनिर्मितीचा पण सध्या आपला भर कोळसाधारित विजेवरच..

देशातील शहरे ही उष्णतेची बेटे कशी बनू लागली आहेत या बातम्यांच्या जोडीने ठिकठिकाणच्या अघोषित संचारबंदीचे वृत्त अजिबात धक्कादायक नाही. या संदर्भात ‘लोकलसर्कल्स’ या प्रतिष्ठित नवउद्योगाने केलेली पाहणी लक्षणीय ठरते. देशातील २७२ जिल्ह्यांत केलेल्या या पाहणीनुसार सुमारे ८५ टक्क्यांनी आपणास दैनंदिन किमान एक वा दोन वेळा वीजकपातीचा सामना करावा लागतो, असे सांगितले. यापैकी ५७ टक्क्यांच्या घरांत तर किमान दोन तास वीज नसते आणि ३७ टक्क्यांना दोन ते आठ तास इतका वीजकपातीचा सामना करावा लागतो. विजेवर चालणाऱ्या गाड्यांचा प्रसार, प्रचार आणि व्यापार वाढत असताना विजेच्या उपलब्धतेबाबतचे हे सत्य सध्याच्या भीषण उन्हाळ्यात अधिक घाम फोडणारे ठरावे. रोजच्या जगण्यात किमान काही काळ वीज उपलब्ध नसण्याने देशातील नागरिक, उद्योग आणि शेती अक्षरशः होरपळून निघत आहे. विजेबाबतचा हाच अनुभव सार्वत्रिक आहे. याच संबंधात मेघालयाच्या उच्च न्यायालयाने राज्य सरकारला फटकारताना वीज ही चैन नसून जीवनावश्यक बाब आहे, असे फटकारले. मिळेल त्या मार्गाने वीजनिर्मिती गरजेची असताना अणुऊर्जा निर्मिती स्तब्ध आहे, धरण उभारणी थांबलेली असल्याने जलविद्युतही त्याच अवस्थेत आहे आणि त्याच वेळी देशातील एकूण विजेच्या उत्पादनात कोळशाच्या विजेचा वाटा ७५ टक्क्यांवर गेला आहे. पाश्चात्त्यांचे अनुकरण करत वीजनिर्मितीसाठी कोळशाचा वापर कमी करण्याची घोषणा आपल्याकडून आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवरून सतत केली जात असली तरी त्यावरील अवलंबित्व कमी करण्याच्या दृष्टीने ज्या वेगाने हालचाली व्हावयास हव्या होत्या, त्या झाल्या नाहीत. परिणामी देशातील प्रत्येक घरात दिवसाकाठी काही काळ वीजच उपलब्ध नसते.

अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मूलभूत गरजांएवढीच विजेची उपलब्धताही महत्त्वाची आहे, हे लक्षात घेऊन, जगातील विकसित देशांनी विजेच्या उत्पादनावर अधिक भर दिला. त्याचा विकासाशी थेट संबंध



असल्याने ते देश वेगाने प्रगती करू शकले. जमीन, पाणी, कुशल मनुष्यबळ आणि ऊर्जेची उपलब्धता ही औद्योगिक विकासाची चार चाके असतात. यापैकी एका चाकात हवाच नसल्याने विकासाला वेगाने पुढे जाण्यात आडकाठी निर्माण होते. कोळशावरील विजेचे उत्पादन कमी करणे शक्य नाही आणि अणुऊर्जेच्या प्रकल्पांचे घोंगडे भिजतच राहिल्याने अनेक प्रश्न ऐरणीवर आले आहेत. देशातील एकूण वीज उत्पादनापैकी सर्वाधिक म्हणजे ४१ टक्के वापर उद्योगांमध्ये तर २६ टक्के घरगुती आणि १७ टक्के शेतीसाठी होतो. या तीनही क्षेत्रांत विजेची मागणी सातत्याने वाढत असतानाही, ती गरज भागवता येणे शक्य होत नाही. एप्रिलमध्ये एकाच दिवशी विजेची मागणी २१५ गिगावॅट होती, तर १३ मे रोजी ती २०८ गिगावॅट एवढी होती. उपलब्ध विजेचा वापर आवश्यकतेनुसार करणे भाग असल्याने साहजिकच घरगुती आणि शेतीच्या वापरासाठी भारनियमन केले जाते. ही स्थिती बदलण्यासाठी पर्यायी इंधनाची क्षमता प्रचंड प्रमाणात वाढवत नेणे एवढा एकच मार्ग उरतो. पण तो दीर्घकालीन आहे. त्याचा उपयोग उद्यासाठी! आजच्या संकटावर मात करण्यास त्याचा आधार नाही. एकीकडे विजेचा वापर अतिरेकी प्रमाणात वाढत असताना, दुसरीकडे विजेऱ्यांवर – वीज आधारित बॅटरीवर- चालणाऱ्या वाहनांच्या उत्पादनांस भरघोस मदत देण्याचे धोरण सरकार अवलंबते. मात्र या बॅटरीत ज्या विजेच्या साह्याने पुनर्भरण करायचे, ती वीजच पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणार नसेल, तर अशा बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांनाही समस्यांना तोंड द्यावेच लागणार. शहरांमध्ये विजेचा वापर तुलनेने अधिक असतो; मात्र पुरवठा सलग नसतो. विशेषतः उन्हाळ्यात घराघरांत २४ तास वीज आवश्यक ठरते. बदलत्या जीवनशैलीमुळे घरोघरी आलेल्या वातानुकूलन यंत्रांमुळे विजेचा वापर अधिक होतो. घराघरांत वीज गेल्यास आवश्यक असणाऱ्या इनव्हर्टरसारख्या यंत्रांमधील बॅटरीसाठीही पुन्हा विजेच्या स्रोतांचीच आवश्यकता असते. देशाची विजेची वार्षिक उत्पादन क्षमता १४८४ टेरावॅट-तास एवढी आहे आणि मागणी मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. ती पुरवण्यासाठी अणुऊर्जेसारख्या प्रकल्पांना लवकरात लवकर कार्यान्वित करणे एवढाच मार्ग. पण त्या मार्गावर सारे कसे शांत शांत!

घरोघरी विजेची जोडणी दिली तरी तेथे विजेचा नियमित आणि अखंडित पुरवठाच होत नसेल, तर त्या जोडण्यांबद्दल फुशारक्या मारण्यात काही हशील नाही. वीज ही आता दैनंदिन गरज असून ती मुळीच चैन नाही. त्यामुळे ती उपलब्ध करून देणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. पुरेशा प्रमाणात वीज मिळत नसेल, तर तिच्या उत्पादनासाठी आवश्यक त्या योजना करणे हेही सरकारचेच कर्तव्य आहे, अशा शब्दांत मेघालयाच्या उच्च न्यायालयाने तेथील राज्य सरकारला नुकतेच सुनावले.

## संपादकीय »

### तापलेली वसुंधरा!

***राज्यातच नव्हे, तर देशाच्या बहुतेक भागांत उष्म्याची लाट आली असून, दिवसा रस्त्यांवरून फिरणे अवघड बनले आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ या सर्व भागांत उष्म्याची लाट आहे.***

बहुतेक ठिकाणी पारा चाळीस अंश सेल्सिअसच्या वर आहे, तर अकोला, जळगाव आदी भागांत तो ४५ अंश सेल्सिअसच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. उन्हाळ्यातही शीतल वाटावे अशा ठिकाणी म्हणजे महाबळेश्वर, लोणावळा, माथेरान आदी गिरिस्थानांतही सूर्य आग ओकत आहे. एके काळी आल्हाददायक हवामानासाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यातही पाऱ्याने चाळीस अंशाचा टप्पा ओलांडला. मुंबईत उकाडा नवीन नसला, तरी उष्म्याचा त्रास खूप वाढला आहे. कोकणातही हेच चित्र आहे. थोडक्यात, राज्याच्या सर्व भागांत तापमानाचा कहर सुरू आहे. तापमान सरासरीपेक्षा पाच अंशाने अधिक असल्यास उष्म्याची लाट आली, अशी व्याख्या हवामान विभाग करते. त्यानुसार सध्या राज्यात आणि देशाच्या अनेक भागांत ही लाट असून, आणखी काही दिवस ती कायम राहील, असा अंदाज आहे.

**भारत खंडप्राय, त्यामुळे लागवडीखालील क्षेत्रही मोठे, अन्नधान्य उत्पादन ठीक.. पण ‘एल-निनो’चा दुष्काळी इशारा दरवेळी खोटाच ठरेल असे नाही... भारतीय हवामान विभागासह जगभरातील अनेक हवामानविषयक संस्थांनी जुलै महिन्याच्या अखेरीस प्रशांत महासागरात एल-निनोचा प्रभाव वाढण्याचा अंदाज व्यक्त केल्याने प्रामुख्याने आशिया खंडातील देश चिंताग्रस्त होणे स्वाभाविक आहे.**

## सावध ऐका; पुढल्या हाका...



जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६० टक्के लोकसंख्या केवळ याच खंडात असल्याने ही झळ अधिकांना बसेल. अर्थात आजवर ज्या ज्या वेळी एल-निनोचा प्रभाव भारतावर होता, त्या प्रत्येक वेळी मोठ्या प्रमाणावर दुष्काळी स्थिती निर्माण झालीच, असे घडलेले नाही. त्यामुळे यंदाही तीव्र दुष्काळ पडेल, असे गृहीत धरणे कदाचित चुकीचेही ठरू शकेल. मात्र, खरिपाच्या पेरणीपूर्वीच योग्य ते नियोजन केले, तर भारताला एल-निनोच्या प्रभावातही तरून जाता येऊ शकेल. एल-निनोचा परिणाम म्हणून आग्नेय आशिया, मध्य आशिया आणि दक्षिण आशियातील देशांत तीव्र दुष्काळ पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित देशांतील धोरणकर्ते अधिक सावध झाले आहेत. संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषी संघटनेने (एफएओ) प्रशांत महासागरात जुलै महिन्याच्या अखेरीस एल-निनो विकसित होऊन नैर्ऋत्य मोसमी पावसावर विपरीत परिणाम होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. विशेषकरून नैर्ऋत्य मोसमी पाऊस हा ज्या ज्या देशांची पाण्याची गरज भागविणारा मुख्य जलस्रोत आहे, त्या सर्व देशांनी एल-निनोचा चांगलाच धसका घेतला आहे. विविध जागतिक हवामान संस्थांच्या अंदाजानुसार ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, म्यानमार, मलेशिया, थायलंडसह आणि दक्षिण आशियातील भारत, बांगलादेश, पाकिस्तानसह मध्य आशियातील अनेक देशांत तीव्र दुष्काळ पडू शकतो, असाही अंदाज आहे.

भारतीय हवामान विभाग (आयएमडी) मे अखेरीस ‘मोसमी पावसाचा दुसरा सुधारित अंदाज’ व्यक्त करते. त्या अंदाजाकडे आता सर्वांचे लक्ष लागून आहे. परंतु, दुष्काळ, दुष्काळजन्य स्थिती किंवा कमी पावसाची भीती कायम आहे. एकूणच कमी पावसामुळे आशियातील तांदूळ, सोयाबीन, मका, गहू या शेती उत्पादनांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. भारताचा विचार करता देशात यंदा एल-निनोचा प्रभाव ऑगस्ट महिन्यापासून दिसून येईल. अनेक ठिकाणी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल तर काही देशांना दुष्काळी स्थितीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

नैर्ऋत्य मोसमी पावसावर भिस्त प्रामुख्याने आशिया खंडाचीच. ज्या आशियाई देशांत दुष्काळजन्य स्थितीचा आणि त्याचा परिणाम म्हणून अन्नधान्य उत्पादनात मोठ्या घटीचा अंदाज आहे. जगाची एकूण लोकसंख्या आठ अब्जांच्या घरात आहे, त्यापैकी आशिया खंडातील लोकसंख्या ४.७५ अब्ज आहे. एल-निनोचा प्रभाव ऑस्ट्रेलियावरही पडेल.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# यंदा मान्सून उशिराने येणार!

## महाराष्ट्रात 10 जूननंतर आगमन? देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम, तज्ज्ञांकडून मत

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात अवकाळी पाऊस ओसरला असून आता कडक उन्हाच्या झळा बसण्यास सुरुवात झाली आहे. अशात यंदाचा मान्सून हा राज्यात उशिरा दाखल होणार आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने (IMD) दिलेल्या माहितीनुसार, नैऋत्य मान्सून यावेळी केरळमध्ये उशिराने दाख होणार आहे. १ जूनला येणार मान्सून यंदा ४ जून रोजी केरळच्या किनारपट्टीवर धडकेल.**



त्यामुळे शेतकऱ्यांसाठी ही निराशाजनक बातमी आहे. राज्यात उष्णतेचा पारा वाढत असताना आता मान्सूनही उशिरा दाखल होणार असल्याचा इशारा हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. तर याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवरही पाहायला मिळणार, असं मत तज्ज्ञांकडून वर्तवण्यात आलं आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, जर ४ जून रोजी मान्सूनचं केरळमध्ये आगमन झालं तर पुढील २ दिवसांत म्हणजेच ६ जून रोजी मान्सून महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे. पुणे वेधशाळेने हा अंदाज वर्तवला आहे. त्यानुसार मुंबईत यंदा १० किंवा ११ जूनला मान्सूनचे आगमन होणार आहे.

दरवेळी १ जून रोजी मान्सून केरळमध्ये दाखल होत असतो. मात्र, यंदा हाच मान्सून दोन ते तीन दिवस उशिराने दाखल होईल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. अशात शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी म्हणजे भारतात यंदा ९६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर मान्सूनच्या दुसऱ्या सत्रात भारतात एल निनोचा प्रभाव पाहायला मिळू शकतो.

### मान्सूनचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम...

**उशिरा दाखल होत असलेल्या मान्सूनचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही मोठा परिणाम होणार आहे. भारतीत तब्बल ५२ टक्के शेतजमीन ही शेतीसाठी पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. तर देशातील सुमारे ४० टक्के अन्नधान्य याच कृषी क्षेत्रातून तयार होतं. त्यामुळे याचा परिणाम कुठेतरी देशाच्या अर्थव्यवस्थेवर होईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.**

# सततच्या पावसाची नुकसानभरपाई शेतकऱ्यांना दहा दिवसांत

## मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री शिंदे यांचे निर्देश

। मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना येत्या दहा दिवसांत देण्याचे निर्देश मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. राज्यातील नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर आणि पुणे महसूल विभागातून राज्य सरकारकडे तीन हजार १२८ कोटी ९६ लाख रुपयांचे प्रस्ताव आले असले तरीही सरसकट ही भरपाई दिली जाणार नाही. भरपाईची रक्कम शास्त्रीय निकषाच्या अधारे निश्चित केली जाणार आहे. या निकषाच्या अधारे पाठवलेले प्रस्ताव भरपाईसाठी पात्र ठरवले जाणार आहेत.**




मंत्रिमंडळ बैठकीत पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांनी शेतकऱ्यांच्या मदतीचा मुद्दा उपस्थित केला. यावर ग्रामीण भागातील इतर मंत्र्यांनी शेतकऱ्यांना तातडीने ही मदत मिळाली पाहिजे असा आग्रह धरला. यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी मदत व पुनर्वसन विभागाच्या सचिवांना याबाबत विचारणा केली. सचिवांनी पुढील दहा दिवसांत मदत दिली जाईल, असे सांगितले. यावर मुख्यमंत्री शिंदे यांनी मुदत व पुनर्वसन विभागाने दहा दिवसांत शेतकऱ्यांना भरपाईची रक्कम मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे निर्देश दिले.

सततच्या पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारने या अगोदर ७५५ कोटी ६९ लाख रुपये इतका निधी वितरित केला आहे. मात्र सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीच्या प्रस्तावाची संख्या आणि देण्यात येणारी मदत याचा विचार करून राज्य सरकारने नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीने नुकसानीचे काही शास्त्रीय निकष गृहीत धरले आहेत. यानुसार शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी होणार आहे. यानुसार आलेल्या प्रस्तावांची या निकषाद्वारे पडताळणी करूनच नुकसानीची रक्कम निश्चित केली जाणार आहे. या क्षेत्रावरील बाधित शेतकऱ्यांचे सुमारे ३ हजार १२८ कोटी ९६ लाख रूपयांचे प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून पाठवण्यात आले आहेत.

### अकोला येथे पशुवैद्यकीय महाविद्यालय

**अकोला येथे पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या महाविद्यालयातील ५६ शिक्षक, ४८ शिक्षकेतर संवर्ग असे १०४ पदे तसेच बाह्यस्रोताद्वारे ६० पदे अशी १६४ पदे नव्याने निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली. या पदांसह इतर अनुषंगिक खरेदी वगैरेसाठी मिळून ३१६ कोटी ६५ लाख एवढ्या खर्चास मान्यता देण्यात आली. अर्थसंकल्पात जळगाव आणि अकोला जिल्ह्यात २ नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती.**

# "शिंदे सरकार जाणार नाही", अजित पवारांना विश्वास!

। ठाणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।



महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयात ११ महिने प्रदीर्घ सुनावणी झाली. त्यानंतर गेल्या आठवड्यात सुप्रीम कोर्टाने यावरील निकाल जाहीर केला. कोर्टाने सरकारच्या आणि राज्यपालांच्या कारभारावर ताशेरे ओढले खरे परंतु एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचं सरकार कायम राहिलं. दरम्यान, सुप्रीम कोर्टाने आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे सोपवला आहे. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आता यावर निर्णय घेतील. परंतु शिवसेनेच्या ठाकरे गटातील नेत्यांना विश्वास आहे की, हा निकाल ठाकरे गटाच्या बाजूने लागेल आणि शिंदे गटातील १६ आमदार अपात्र होतील. परंतु शिवसेनेच्या ठाकरे गटाचा मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मात्र वेगळं मत मांडलं आहे.

अजित पवार सोमवारी पत्रकारांशी बातचित करताना म्हणाले की, आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात माझं स्वतःचं स्पष्ट मत आहे. २८८ पैकी यदाकदाचित त्या १६ आमदारांचा निकाल काही वेगळा (आमदार अपात्र ठरले) लागला. वेगळा निकाल लागणारच नाही म्हणा. पण समजा लागला तरी त्या निकालाचा सरकारच्या बहुमतावर कुठलाही परिणाम होणार नाही. दरम्यान, आता अजितदादांचे सहकारी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अजित पवारांच्या विसंगत मत व्यक्त केलं आहे.

जयंत पाटील म्हणाले, एकनाथ शिंदे अपात्र ठरले तर हे सरकार जाणार. जयंत पाटील म्हणाले, या १६ आमदारांमध्ये एक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील आहेत. मुख्यमंत्रीच जर अपात्र ठरले तर हे सरकार जाणार. कारण जेव्हा मुख्यमंत्री जातो तेव्हा सरकारही जातं. राहिला प्रश्न बहुमताचा, तर २८८ पैकी १६ आमदार गेले तर बाकी शिवसेना सदस्य जे शिंदे गटात आहेत त्यांचा विचार बदलू शकतो.

# डोक्यात हवा गेली', शहनाज गिलवर चाहते भडकले

शहनाज गिल हे नाव आता चांगलचं परिचीत झालं आहे. बिग बॉस 13 नंतर शहनाज गिलला एक नवीन ओळख मिळाली आहे. ती सर्वांची लाडकी आहे. तिचे चाहते तिच्यासाठी काहीही करायला तयार असतात. ती नवनवीन प्रोजेक्ट करतांनाही आहे. सिद्धार्थ शुक्लाच्या निधनांनतर तिला सर्वांनीच सहानभूतीही दिली. मात्र तिचा एक व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. शहनाजच्या नुकत्याच समोर आलेल्या व्हिडिओवर युजर्स हाच तिचा खरा चेहरा असून हिच तिची सत्यता असल्याचं सांगत आहे.

शहनाज गिल आणि रॅपर एमसी स्क्वेअर त्यांच्या गाण्यामूळं चर्चेत आहे. या गोण्याचं प्रमोशन करण्यासाठी दोघ बिग बॉस 16 या रिॲलिटी शोमध्ये गेले होते. पापाराझींने त्यांना सेटबाहेर घेरले. दरम्यान, शहनाज काही त्यांना पोझ देतांना त्याच्याशी उद्धटपणे संवाद साधतांना दिसतेय. ती म्हणते, "अरे, गाण्याचंही प्रमोशन करा." यांना फक्त फोटो हवे आहेत. यानंतर ती एमसी स्क्वेअरला इशारा करत गाणे गायला सांगते. तो घणी स्यानी गाणं गातो आणि शहनाजनेही गाण्यावर डान्स करते. गाणे संपताच शहनाज म्हणते, “ये सगळ कट होऊन जाइल आणि दुसरचं काही दिसेलं. मग पापाराझी तिला सोलो पोज देण्यास सांगतात, त्यावर शहनाज स्क्वायरचा हात धरून बिग बॉसच्या सेटकडे जाते आणि म्हणते, "सोलो का?"



# राणादा-पाठकबाईंच्या लग्नाची क्रेझ काही संपेना

हार्दिक जोशी व अक्षया देवधरच्या लग्नाची क्रेझ अजूनही कायम आहे. अक्षयाचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हार्दिक जोशी व अक्षया देवधर २ डिसेंबरला विवाहबंधनात अडकले. या दोघांच्या लग्नाचे बरेच व्हिडीओ व फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. अजूनही या दोघांच्या विवाहसोहळ्याची चर्चा रंगत आहे. हार्दिक-अक्षयाच्या लग्नाचं क्रेझ काही संपत नाही. अक्षयाचा संगीत कार्यक्रमाचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये अक्षया हार्दिकसाठी गाणं गाताना दिसत आहे. हार्दिक व अक्षयाने लग्नगाठ बांधत चाहत्यांना सुखद धक्का दिला. या दोघांच्या जोडीला चाहते भरभरून प्रेम देत आहेत. हार्दिकनेही अक्षयासाठी सरप्राईज डान्स केला होता. अक्षयाने हिंदी रोमँटिक गाणं गात हार्दिकला सरप्राईज दिलं.



# टीना दत्ताला मोठा झटका!

रिॲलिटी शो 'बिग बॉस 16' आता जास्तचं मनोरंजक झाला आहे. आता या शोबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. घरातील तगडी स्पर्धक टीना दत्ताला या आठवड्यात घरातुन बाहेर जावं लागणार असा दावा करण्यात आला आहे. ती या आठवड्यात नॉमिनेट झालेली होती. तिच्यासोबत निमृत कौर अहलुवालिया, सुंबूल तौकिर खान आणि एमसी स्टॅन यांनाही नॉमिनेट करण्यात आलं होतं.

तेव्हापासूनच टिना दत्ता सोशल मीडियावर ट्रेंड करत आहे. त्यातच बाहेर पडण्याच्या वृत्ताने काहींना आनंद झाला तर अनेकांना दुःख झाले. आजच्या वीकेंड का वार मध्ये, सलमान खान टीनाचा क्लास देखील घेणार आहे, ज्यामुळे ती शोमध्ये रडतांनाही दिसणार आहे.

टीना दत्ता बेदखल झाल्याचा दावा मीडिया रिपोर्ट्समध्ये केला जात आहे. दरम्यान चॅनेल किंवा निर्मात्यांकडून याबद्दल अधिकृत घोषणा झालेली नाही. आजच्या एपिसोडच्या प्रोमोमध्ये सलमान खान घराबाहेरच्या गोष्टीवर घरात चर्चा केल्यामूळं टीना दत्ताचा क्लास घेणार आहे. तिला काही प्रॉब्लेम आहे का असं विचारल्यानंतर ती रडते. त्यानंतर ती कन्फेशन रूममध्ये जाते आणि सांगते की ती आता हे नाही करू शकत. दरम्यान, टीनाला बाहेर काढल्याची बातमी ऐकल्यानंतर सोशल मीडियावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. काही लोक असेही म्हणत आहेत की टीनाला हाकलून दिलं जाणार नाही, तर तिला सिक्रेट रुममध्ये पाठवलं जाऊ शकतं. तर अनेक लोक टीना दत्ताच्या समर्थनातही आहेत. टीनाची अवस्था पाहून त्यांना वाईटही वाटत आहे.

या आठवड्यात बाहेर जाण्यासाठी 4 स्पर्धक नामांकित आहेत. या यादीत टीना दत्ता व्यतिरिक्त निमृत कौर अहलुवालिया, सुंबुल तौकीर खान आणि एमसी स्टेन यांचाही समावेश आहे. टीनाला आता बाहेर काढलं जाईल की आणखी कोणी बाहेर जाईल, हे वीकेंड का वारमध्येच कळेल. तुम्ही कलर्स चॅनल आणि वूट ॲपवर सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता आणि शनिवार-रविवार रात्री ९ वाजता हा कार्यक्रम पाहू शकता.



# शुभांगी गोखले यांचा जुना फोटो शेअर करत सखी गोखलेची आईसाठी खास पोस्ट

अभिनेत्री शुभांगी गोखले यांनी मराठीसोबतच हिंदी मालिका आणि सिनेमांमधून प्रेक्षकांची मोठी पसंती मिळवली आहे. त्या मनोरंजन सृष्टीतील एक बहुआयामी अभिनेत्री म्हणून ओळखल्या जातात. आज त्यांचा वाढदिवस आहे. त्यांची मुलगी अभिनेत्री सखी गोखले दरवर्षी आईच्या वाढदिवस काही ना काही करून स्पेशल करत असते. आता आज तिने आईला वाढदिवसाच्या हटके शुभेच्छा दिल्या आहेत. सखी गोखले ही तिच्या मनमोकळ्या स्वभावाने तिच्या स्पष्टवक्तेपणामुळे चर्चेत असते. सोशल मीडियावर सक्रिय राहत ती विविध



तिच्या चाहत्यांशी संपर्कात राहते. तिच्या आईशी म्हणजे अभिनेत्री शुभांगी गोखले यांच्याबरोबर तिचं खास नातं आहे. ती बऱ्याचदा तिच्या आईबद्दल तिला वाटणारं प्रेम हटके शब्दात व्यक्त करत असते.

# ‘मेरा दिल ये पुकारे आजा’ फेम पाकिस्तानी तरुणीला विकायचाय तिचा हिरवा ड्रेस



‘‘मेरा दिल ये पुकारे आजा’ या गाण्यावर डान्स करत आपल्या व्हिडीओने इंटरनेटवर धुमाकूळ घातला आहे. या एका व्हिडीओमुळे पाकिस्तानी मुलगी आयशा रातोरात इंटरनेटवर व्हायरल झाली. या आयशाला आता तिच्या व्हायरल हिरव्या कुर्तीचा लिलाव करायचा आहे. तिने या ड्रेसची किंमत ३ लाख रुपये ठेवली आहे. जर तुम्हाला तिचा हा ड्रेस हवा असेल तर तुम्हाला ३ लाख रुपये खर्च करावे लागतील. ‘पीपल मॅगझिन पाकिस्तान’ने दिलेल्या वृत्तानुसार, आयशाने हा ड्रेस तिच्या मैत्रिणीच्या लग्नात परिधान केला होता आणि लता मंगेशकर यांच्या ‘मेरा दिल ये पुकारे’ या गाण्यावर डान्स केला होता. तिचा डान्स व्हिडीओ एका रात्रीत सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. तिने डान्स केलेलं हे गाणं १९५४ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘नागिन’ चित्रपटातील आहे. ते वैजयंतीमाला आणि प्रदीप कुमार यांच्यावर चित्रित करण्यात आलं होतं. या व्हिडीओमध्ये आयशाच्या डान्स स्टाइलने आणि तिच्या साधेपणाने लोकांची मनं जिंकली. तिचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियावर तिचे फॉलोअर्स मोठ्या प्रमाणात वाढले. आयशा ही पाकिस्तानमधील प्रसिद्ध टिकटॉकर आहे, तिचे टिकटॉक व्हिडीओज व्हायरल होत असतात. एका न्यूज पोर्टलशी बोलताना आयशाला जेव्हा व्हायरल होत असलेल्या व्हिडीओबद्दल विचारण्यात आले तेव्हा आयशाने सांगितले की, तिच्या बेस्ट फ्रेंडच्या लग्नात तिने हा डान्स केला होता. ती म्हणाली, “मला दुसऱ्या गाण्यावर डान्स करायचा होता, पण माझ्या मैत्रिणीने मला या गाण्यावर परफॉर्म करण्यास सांगितले. माझ्या बेस्ट फ्रेंडचं लग्न होतं, त्यामुळे तिच्या आवडत्या गाण्यावर डान्स केला.

# जिंकता-जिंकता मुंबईचा संघ हरला

## आयपीएल: इशानचे अर्धशतक वाया, दमदार सलामीनंतर पराभव

**|लखनौ |**

**महाईन्यूज | वृत्तसंस्था |**

**मुंबई आणि लखनौ यांच्यातील सामना चांगलाच रंगतदार झाला. लखनौने मुंबईपुढे विजयासाठी १७८ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईच्या अशान किशनने ५९ धावा केल्या होत्या.**

मुंबईच्या संघाने जिंकणारा सामना गमावला. मुंबईने झोकात सुरुवात केली आणि त्यांनी ९० धावांची सलामी दिली. पण रोहित शर्मा बाद झाला आणि त्यानंतर इशान आणि सूर्यकुमारही लवकर तंबूत परतले. मुंबईच्या मधल्या फळीतील फलंदाजांनी हाराकिरी केली आणि तिथेच हा सामना मुंबईच्या हातून निसटला. लखनौच्या संघाने मुंबईपुढे विजयासाठी १७८ धावांचे आव्हान ठेवले होते. पण मुंबईच्या संघाला १७२ धावा करता आल्या आणि त्यांना पाच धावांनी पराभव पत्करावा लागला.

लखनौच्या १७८ धावांचा पाठलाग करताना मुंबईच्या संघाने आश्वासक सुरुवात केली. यापूर्वीच्या सामन्यांमध्ये रोहित शर्मा लवकर बाद होत होता. पण यावेळी रोहित खेळपट्टीवर टिकून राहीला. रोहितला अर्धशतक झळकावता आले नसले तरी त्याच्या खेळीने मुंबईच्या संघाला चांगली सलामी मिळाली. रोहितने यावेळी २५ चेंडूंत ३७ धावांची खेळी साकारली. त्यामुळे मुंबईच्या संघाला १० षटकांत ९० धावांची सलामी देता आली. इशानने यावेळी आपले अर्धशतक मात्र पूर्ण केले. पण अर्धसतकानंतर तो जास्त काळ फलंदाजी करू शकला नाही. इशानने ३९ चेंडूंत आठ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ५९ धावांची खेळी साकारली. त्यानंतर सूर्यकुमार यादवही सात धावांवर बाद झाला आणि त्यामुळे सामना अधिक रंगतदार झाला.



मुंबईने लखनौच्या संघाला सुरुवातीलाच धक्के दिले होते. मुंबईचा वेगवान गोलंदाज जेसन बर्डनहॉफने सलग दोन चेंडूंमध्ये लखनौच्या दौन फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला. जेसनने तिसऱ्या षटकातच सलामीवीर दीपक हुडाला पाच धावांवर बाद केले. त्यानंतरच्याच चेंडूवर जेसनने गेल्या सामन्यात मॅचविनर ठरलेल्या प्रेरक मांडकला शून्यावर बाद केले. जेसनने एकामागून एक दोन धक्के दिल्यावर लखनौचे कंबरडे चांगलेच मोडले. जेसन या आयपीएलमध्ये सातत्याने अचूक आणि वेगवान गोलंदाजी करत आहे. मुंबई इंडियन्सने लखनौची या सामन्यात जेसनमुळे २ बाद १२ अशी दयनीय अवस्था केली होती. त्यानंतर पीयुष चावलाने अजून एक धक्का लखनौला दिला. पण त्यानंतर मार्कस स्टॉयनिस आणि कर्णधार कृणाल पंड्या यांची जोडी चांगलीच जमली. या दोघांनी मिळून लखनौच्या संघाचा डाव सावरला. कारण या दोघांनी महत्वाच्या क्षणी अर्धशतक भागीदारी रचली.

### मुंबईला चांगला रनरेटही ठेवावा लागणार

**»पराभवानंतर मुंबई इंडियन्सला गुणतालिकेतही धक्का बसला. कारण या सामन्यापूर्वी मुंबईचा संघ १४ गुणांसह तिसऱ्या स्थानावर होता. पण या सामन्यात त्यांचा पराभव झाला आणि लखनौने दोन गुणांची कमाई केली. लखनौचा संघ यापूर्वी चौथ्या स्थानावर होता. विजयासह त्यांनी मुंबईच्या संघाला धक्का दिला आणि त्यांनी तिसरे स्थान पटकावले आहे. त्यामुळे मुंबईच्या संघाची आता चौथ्या स्थानावर घसरण झाली आहे. आता मुंबईचा एक सामना शिल्लक आहे. त्यामुळे कोणत्याही परीस्थिती त्यांना हा अखेरचा सामना जिंकावा लागेल. मुंबईने जर हा सामना जिंकला तर त्यांचे १६ गुण होतील. पण १६ गुणांसह त्यांचे प्ले ऑफमधील स्थान निश्चित होऊ शकत नाही. त्यामुळे मुंबईच्या संघाने जरी अखेरच्या सामन्यांत विजय मिळवला तरी त्यांना अन्य संघांची कशी कामगिरी होते, हे पाहावे लागेल. त्यामुळे अखेरचा सामना जिंकणे आणि अन्य संघाची कामगिरी यावर मुंबईचा संघ प्ले ऑफमध्ये पोहोचू शकतो. पण जर मुंबईला अखेरच्या सामन्यात विजय मिळवता आला नाही तर त्यांच्यासाठी प्ले ऑफचे गणित अजून कठीण होऊ शकते. त्यामुळे अखेरच्या सामन्यांत त्यांनी मोठा विजय मिळवला तर त्यांना प्ले ऑफमध्ये पोहोचण्याची संधी असेल. कारण विजयाबरोबर मुंबईच्या संघाला चांगला रनरेटही ठेवावा लागणार आहे. त्यामुळे त्यांना फक्त विजय मिळवून चालणार नाही तर त्यांना मोठा विजय मिळवावा लागेल.**

# आयपीएल:स्टार स्पोर्ट्सवर बंदी घालण्याची मागणी

## आयपीएल आणि स्टार स्पोर्ट्स यांचं नातं गेल्या काही वर्षांपासून घट्ट

**| दुबई |**

**महाईन्यूज | वृत्तसंस्था |**

**आयपीएलचा यंदाचा हंगाम रंगात आला आहे. या स्पर्धेतील साखळी सामने सुरू असून मागील वर्षीप्रमाणेच यावेळीही गुजरातचा संघ दमदार कामगिरी करत असून गुणतालिकेत अव्वल स्थानी आहे. दुसऱ्या क्रमांकावर एम. एस. धोनीच्या नेतृत्वाखालील चेन्नई सुपर किंग्ज हा संघ आहे. तसंच मोसमाच्या सुरुवातीला सूर न गवसलेल्या मुंबईनेही तिसऱ्या स्थानी झेप घेतली आहे.**


मात्र अद्याप एकाही संघाला पात्रता फेरीत प्रवेश करता आलेला नाही. त्यामुळे सर्वच संघांच्या समर्थकांची धाकधूक वाढली असून ही स्पर्धा रंगतदार स्थिती आली आहे. मात्र अशा स्थितीतच दूरचित्रवाहिनीवर थेट प्रक्षेपण करणाऱ्या 'स्टार स्पोर्ट्स'वर बंदी घालण्याची मागणी सोशल मीडियावर जोर धरू लागली आहे. आयपीएल आणि स्टार स्पोर्ट्स यांचं नातं गेल्या काही वर्षांपासून घट्ट झालं आहे. मागील अनेक हंगामांत स्टार स्पोर्ट्सने आयपीएलचे यशस्वी प्रक्षेपण करत अनेक क्रिकेटप्रेमींच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला. मात्र, यंदा रिलायन्स उद्योग समूहाच्या जिओ टीव्हीने देखील आयपीएलच्या डिजिटल प्रक्षेपणाचे हक्क विकत घेतल्याने स्टार स्पोर्ट्सच्या प्रेक्षकांची संख्या काही अंशी कमी झाली आहे. अशातच शुक्रवारी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात टायटन्स या संघांचा सामना पार पडला. या सामन्याआधी होणाऱ्या प्री-मॅच सोहळ्यात स्टार स्पोर्ट्सकडून वादग्रस्त स्टँडअप कॉमेडियन मुनव्वर



### हिंदू धर्मियांच्या देव देवतांवर टीका केल्याचा आरोप

**» कॉमेडियन मुनव्वर फारुकीला स्टार स्पोर्ट्सने आमंत्रित केल्यामुळे मुन्नवरच्या कामाविषयी आक्षेप असणाऱ्या काही क्रिकेट चाहत्यांनी 'स्टार स्पोर्ट्स'वर आपला रोष व्यक्त करत या वाहिनीवरच बंदी घालण्याची मागणी केली आहे. ट्विटरवर देखील 'बॅन स्टार स्पोर्ट्स' हा हॅशटॅग ट्रेंड करत होता. दरम्यान, हिंदू धर्मियांच्या देव देवतांवर टीका केल्याचा आरोप करत मुनव्वर फारुकी याच्याविरोधात काही महिन्यांपूर्वी तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर फारुकीला अटकही झाली होती.**

# कृणाल पंड्या मैदानात पडला अन् गौतम गंभीर धावत गेला



**| लखनौ |**

**महाईन्यूज | प्रतिनिधी|**

नशिब हे किती वाईट असू शकतं, याचा प्रत्यय लखनौचा कर्णधार कृणाल पंड्याला आला. कारण कृणाल हा ४९ धावांवर खेळत होता. फक्त एकच चेंडू त्याला अर्धशतकासाठी हवा होता. कृणाल आता अर्धशतक पूर्ण करणार असे वाटत होते. पण बाद न होताही त्याच्यावर मैदानाबाहेर जाण्याची वेळ आली. त्यामुळे त्याचे अर्धशतक तर हुकलेच पण आता तो यानंतर खेळणार की नाही, याबाबतही संदिग्धता आहे. ही गोष्ट घडली ती १६ व्या षटकात. त्यावेळी मुंबई इंडियन्सचा वेगवान गोलंदाज कॅमेरून ग्रीन गोलंदाजी करत होता. या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर ही गोष्ट पाहायला मिळाली. ग्रीनने यावेळी चेंडू टाकला आणि त्यावर मोठा फटका मारण्यासाठी लखनौचा मार्कस स्टॉयनिस तयार होता. पण यावेळी त्याचे टायमिंग चुकले आणि त्याला मोठा फटका मारता आला नाही. हा फटका बॅकवर्ड पॉइंटच्या दिशेने गेला. त्यावेळी चोरटी धाव आपण घेऊ शकतो असे कृणालला वाटले होते. त्यामुळे तो धावत गेला होता.